# नियमीत दिवाणी दावा क्र.९/२०१७

# CNRNoMHOS120002302017

# गोरख वि. शासन

## नि.क्र. ६१ खालील आदेश

(आदेश दि.२७/०६/२०२२)

०१. प्रस्तुतचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र. १७ शिवाजी एकनाथ लोहार याच्या दि. १/३/२०२० रोजी झालेल्या मृत्युमुळे त्याच्याबाबत अवसान झालेला दावा आदेश रद्दबातल होऊन त्याचे वारस रेकॉर्डला घेणेकामी झालेला विलंब माफ करून मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १७ शिवाजी एकनाथ लोहार यांचा मृत्यु ०१/०३/२०२० रोजी झालेला आहे. प्रतिवादी क्र. १७ याचे वारस रेकॉर्डला घेणेकामी वादीने जाणुनबुजुण विलंब केला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

२. या कामी प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

३. प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. नि.क्र.६० पुरसीस सोबत प्रतिवादी क्र. १७ याचा मृत्यु दाखला हजर केला आहे. मृत्यु दाखल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १७ यांचा मृत्यु दि.०१/०३/२०२० रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचा अर्ज हा दि.०७/०३/२०२२ रोजी दाखल केला आहे. कोवीड महामारीमुळे मध्यंतरी न्यायालयीन कामकाज बंद असल्याचा कालावधी वगळता प्रतिवादी क्र. १७ याचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी साधारणपणे आठ महिन्यांचा विलंब झाल्याचे स्पष्ट होते. तथापि, या कामी ही बाब देखील महत्वाची आहे की, प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १७ याचे वारस रेकॉर्डला येणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादीने कॉष्ट भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यास न्यायोचीत आहे. सबब, खालील आदेश.

# आदेश

०१. नि. क्र. ६१ खालील अर्ज वादीने न्यायालयात र.रु. १००/– इतकी कॉष्ट भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

०२. वादीने सदरची कॉष्ट भरल्यानंतर ती सरकार जमा करण्यात यावी.

०३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा वादीने सोसायचा आहे.

स्वाक्षरित/–

दिनांक – २७/०६/२०२२

(ए. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 27/06/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 27/06/2022 |
| Order uploaded on | --- | 27/06/2022 |